इयत्ता: बारावी | विषय: राज्यशास्त्र

बोर्ड परीक्षा: जुलै 2025 | गुण: 80 गुण

---

**प्रश्न १. (अ) कंसांतील योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा : (०५)**

(१) _____ ला भारत देश स्वतंत्र झाला.

(१९४७, १९४९, १९५०, १९५२)

(२) बर्लिनची भिंत _____साली पडली.

(१९९२, १९९१, १९९०, १९८९)

(३) संयुक्त राष्ट्रांची पर्यावरण आणि विकास परिषद १९९२ साली _____ येथे झाली.

(दिल्ली, रिओ दे जेनेरिओ, टोकियो, बर्लिन)

(४) आज भारताचा लिंगभाव निगडित दृष्टिकोन ______वर लक्ष केंद्रित करतो.

(गरिबी, महिला सक्षमीकरण, बालकल्याण, लिंगभेद)

(५) लोकपाल ही संकल्पना _____ या देशापासून स्वीकारली आहे.

(स्वीडन, अमेरिका, फ्रान्स, इटली)

प्र. १ (ब) पुढीलपैकी प्रत्येक गटातील चुकीची जोडी दुरुस्त करून पुन्हा लिहा : (३)

(१) (अ) नियोजन आयोग पंचवार्षिक योजना

(ब) राष्ट्रीय महिला आयोग महिला सक्षमीकरण

(क) ब्रंटलैंड कमिशन आर्थिक विकास

(२) (अ) चारू मुजुमदार - नक्षलवादी चळवळ

(ब) जवाहरलाल नेहरू - डिस्कवरी ऑफ इंडिया

(क) श्रीलंकेतील तामिळी लोकांच्या हक्कांसाठी लढा - आयरीश रिपब्लिकन आर्मी

(३) (अ) भारत - मिश्र अर्थव्यवस्था

(ब) अमेरिका कल्याणकारी - बाजारपेठीय अर्थव्यवस्था

(क) चीन - साम्यवादी बाजारपेठीय अर्थव्यवस्था

**प्र.१ ला (क) दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय/कारण निवडून विधाने पूर्ण करा : (४)**

(१) मास्त्रीक्त करार संदर्भ -

(अ) ब्रिक्सची स्थापना

(ब) युरोपीय संघ

(क) संयुक्त राष्ट्र शांतता रक्षक दल

(२) हवामान बदलाचे प्रमुख कारण ____ या वायूचे उत्सर्जन हे आहे

(अ) नीलगृह वायू

(ब) हरितगृह वायू

(क) लालगृह वायू

(३) नागरिकांची सनद ही संकल्पना _____ याचा भाग आहे -

(अ) विकास प्रशासन

(ब) बिगर सरकारी उपक्रम

(क) सुशासन.

(४) भारताने नदी पाणीवाटपाबाबत फराक्का करार ____ या देशाबरोबर केला आहे -

(अ) बांगला देश

(ब) चीन

(क) नेपाळ

**प्र.१ (ड) - दिलेल्या विधानांसाठी समर्पक संकल्पना लिहा: (४)**

(१) जास्त उत्पन्न देणाऱ्या जातींच्या बियाण्यांचा विकास, सिंचन पद्धतीचा विस्तार

(२) समाजात भीती निर्माण करण्यासाठी हिंसाचाराचा केलेला वापर

(३) देशाचे इतर राष्ट्रांशी संबंध ठेवण्याचे धोरण

(४) कोणत्याही लष्करी कराराचा भाग होण्यास नकार’

प्र.१ (इ) गटात न बसणारा शब्द ओळखा व लिहा : (४)

(१) भारत, रशिया, नेपाळ, पाकिस्तान.

(२) संगणक, अन्न, वस्त्र, निवारा.

(३) दिरंगाई, कार्यक्षम, लालफितीचा कारभार, भ्रष्टाचार.

(४) NATO - SEATO-CENTO-SAARC.

प्र. 2 अ) पुढील संकल्पनाचित्र पूर्ण करा(जुलै '२३) (४)




प्र. 2 (ब ) पुढील नकाशाचे निरीक्षण करून त्यापुढील प्रश्नांची उत्तरे लिहा (५)



आशिया खंडातील प्रमुख देश

(१) भारताच्या दक्षिणेकडील सार्क संघटनेच्या दोन देशांची नावे सांगा. (२)

(२) सार्क संघटनेच्या इतर तीन देशांची नावे सांगा. (3)

**प्र. 3 ) पुढील विधाने चूक की बरोबर ते सकारण लिहा : (कोणतीही पाच)** (१०)

(१) १९८०च्या दशकाला मानवतावादी हस्तक्षेपाचा सुवर्णकाळ म्हणतात.

(२) इंटरनेटच्या माध्यमातून माहिती गोळा करता येते.

(३) पुरुषांचे साक्षरतेचे प्रमाण महिला साक्षरतेपेक्षा जास्त आहे.

(४) भारतीय स्वातंत्र्य चळवळ राष्ट्रीय एकात्मतेस पोषक ठरली.

(५) सुशासनामध्ये नैसर्गिक संसाधनांचा कुशलतेने वापर केला जातो.

(६) नागरिकांचा प्रशासनातील सहभाग लोकशाहीला बळकट करतो.

(७) भारत चीन संबंधांचे स्वरूप गुंतागुंतीचे आहे.

**प्रश्न 4 पुढील विधानांचा सहसंबंध स्पष्ट करा: (कोणतेही तीन)** **(९)**

(१) गॅट आणि जागतिक व्यापार संघटना.

(२) गरिबी आणि विकास.

(३) राष्ट्रीय एकता आणि प्रादेशिक अस्मिता.

(४) सुशासन आणि पारदर्शकता.

(५) भारत आणि रशिया.

प्र**. ५ वा - पुढील विषयांवर तुमचे मत २५ ते ३० शब्दांत मांडा (कोणतेही तीन)** **(१२)**

(१) सॉफ्ट पॉवर विषयी तुमचे मत उदाहरणासह स्पष्ट करा.

(२) सहभागी राज्य समाजासाठी हितकारक आहे.

(३) पर्यावरणाचा ऱ्हास मानवी जीवनास घातक आहे.

(४) ई-प्रशासनाने जनतेला जवळ आणले आहे.

(५) 'भारत एक उगवती सत्ता आहे.' यावर तुमचे मत दया.

**प्र. 6 -  पुढील प्रश्नांची उत्तरे ८० ते १०० शब्दांत लिहा : (कोणतेही दोन)** **(१०)**

(१) शीतयुद्धोत्तर काळातील जागतिक घडामोडींचा परिणाम स्पष्ट करा.

(२) हरितक्रांतीचे परिणाम सविस्तर लिहा.

(३) भारताच्या परराष्ट्र धोरणाला प्रभावित करणारे कोणतेही दोन घटक स्पष्ट करा.

(४) भारतीय समाजातील विविध प्रकारचे हक्क जोपासण्यासाठी स्थापन केलेल्या कोणत्याही पाच आयोगांची माहिती दया.

**प्र. 7 पुढीलपैकी कोणत्याही एका प्रश्नाचे उत्तर दिलेल्या मुद्द्यांच्या आधारे १५० ते २०० शब्दांत लिहा (१० गुण)**

(१) जागतिकीकरणाचा राजकीय क्षेत्रावर झालेला परिणाम मुदूद्यांच्या आधारे स्पष्ट करा :

[ मुद्दे : (अ) जागतिकीकरणाचा अर्थ (व) लोकशाहीचे महत्त्व (क) राज्याचे स्थान (ड) बिगर राजकीय घटक (इ) मानवी हक्क]

(२) राज्याची भूमिका पुढील मुद्दांच्या आधारे स्पष्ट करा :

[ मुद्दे : (अ) शांतता व सुव्यवस्था (ब) आर्थिक प्रगती (क) शासन (ड) लोककल्याण (इ) राष्ट्र उभारणी ]